प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांची आखणी करताना
विचारात घ्यावयाच्या बाबी..

# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक ग्रापाधो-१११०/प्र.क्र.२०७/पापु-०७**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : १३ जून, २०१०**

**वाचा:** शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दि. १७ मार्च, २०१०

**<u>प्रस्तावना</u>:**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. पाणी गुणवत्ता बाधीत गावांमधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाकडून आवश्यक तेथे निक्षारीकरण यंत्रणा बसविण्यात येते. निक्षारीकरण यंत्रणेची मर्यादा व किफायतशीरपणा विचारात घेऊन, इतर ठिकाणाहून पाणी आणून स्वतंत्र / प्रादेशिक योजनेच्या माध्यमातून ते संबंधित गावांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो.

ग्रामीण भागात विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत किंवा रासायनिक पाणी गुणवत्ता बाधित गावांच्या बाबतीत जवळपास पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत उपलब्ध न झाल्यास प्रादेशिक योजनांची आखणी करण्यात येते. मात्र, प्रादेशिक योजनांसाठी खात्रीशीर भूपृष्ठावरील उद्‌भव निवडण्यात आल्याने त्या अनुषंगाने जलशुद्धीकरण यंत्रणा इ.मुळे योजनेचा खर्च मोठया प्रमाणावर वाढतो, यामुळे योजनेची १० टक्के लोकवर्गणी व योजना कार्यान्वित झाल्यावर तिची देखभाल दुरुस्ती अव्यवहार्य ठरते.

यासाठी, प्रादेशिक योजनांची आखणी करीत असताना, त्या जास्त मोठ्या, अवाढव्य करण्याऐवजी चार ते पाच गावांच्या छोट्या सामुदायिक योजना राबविणे संयुक्तीक ठरेल, या योजना चालविण्यासाठी सुटसुटीत व ज्यांना खरोखर गरज आहे, अशा गावांसाठीच त्या घेण्यात याव्यात, अशा सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक :</u>**

पाणी गुणवत्ता बाधीत गावांसाठी असो किंवा इतरही परिस्थितीत, ज्यावेळी प्रादेशिक योजनेद्वारे पाणी पुरवठा करण्याचे प्रस्तावित असेल किंवा योजनेची आखणी करण्यात येत असेल त्यावेळी अनेक गावांची योजना विचारात घेण्याऐवजी किमान ३ व जास्तीत जास्त ४ ते ५ गावांच्या सुटसुटीत योजना आखण्यात याव्यात. ही गावे १० किमी च्या परिघात असावीत. यापेक्षा जास्त गावांसाठी प्रादेशिक योजना घ्यावयाची असल्यास त्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची मान्यता घेण्यात यावी.

अशा योजना आखताना, जर ती पाणी गुणवत्ता बाधीत गावे असतील, तर संबंधित गावांमधील सर्व प्रकारचे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत हे बाधित असतील किंवा अन्य सर्वसाधारण गावांच्या बाबतीत या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत उपलब्ध नसतील / कोरडे झालेले असतील मात्र नजीकच्या परिसरात स्त्रोत उपलब्ध असतील, अशा गावांसाठीच प्रादेशिक योजना प्रस्तावित करण्यात याव्यात. या योजना देखभाल दुरुस्तीसाठी किफायतशीर ठरणार आहेत किंवा कसे तसेच या गावासाठी स्वतंत्र योजना घेणे शक्य नाही याची काटेकोरपणे तपासणी करावी. गाव कोणत्याही परिस्थितीत प्रादेशिक योजनेतून बाहेर पडणार नाही, असा ग्रामसभेचा ठराव देखील घेण्यात यावा.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक **२०११०६१३१५२१३३००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
**(र.अं.खडसे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७